सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :-roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्रमांक.:- विकाअ/शिक्षण/परिपत्रक/२०२६/ 1845
दिनांक :- 13 JUL 2026

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व शासकीय/अनुदानित/विना-अनुदानित
व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था, अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- स्वातंत्र्यवीर सावरकर विचारदर्शन ग्रंथसंच जिल्हातील व राज्यातील शैक्षणिक संस्था व ग्रंथालयांमध्ये उपलब्ध करुन देण्याबाबत**

**संदर्भ :-** मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा. मुंबई यांचा दिनांक ०९/०७/२०२६ रोजीचा ईमेल

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या दैदीप्यमान विचार, प्रखर राष्ट्रभक्ती आणि त्यांचा वैद्यानिक दृष्टीकोन आजच्या तरुण पिढीपर्यंत आणि विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी हर घर सावरकर प्रतिष्ठान पुणे व सकाळ प्रकाशन यांचे संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्यवीर सावरकर विचारदर्शन ग्रंथालयांमध्ये उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याबाबतचा संदर्भीय ईमेल या कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

तरी आपल्या संस्था / महाविद्यालयांमधील ग्रंथालयांमध्ये सदरहू ग्रंथसंच उपलब्ध होण्याच्या दष्टीने कार्यवाही करण्यात यावी. सुलभ संदर्भाकरिता सोबत श्री. सुधिरदादा उर्फ धनंजय सुशीला हरी गाडगीळ, मा. आमदार, सांगली विधानसभा मतदार संघ यांनी मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण ) यांना लिहिलेले दिनांक ११/०६/२०२६ चे सहपत्र पाठविण्यात येत आहे.

सहपत्र :- वरील प्रमाणे.

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार, चौथा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
Email ID:- do.asthahte-mh@ gov.in

क्रमांक:- संकीर्ण -२०२६/ सं.क्र. १६९ /समन्वय

दिनांक:- ३ जुलै, २०२६.

प्रति,

१) संचालक, (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) संचालक, (तंत्र शिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) संचालक, (कला), कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) संचालक (ग्रंथालय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**विषय:- स्वातंत्र्यवीर सावरकर विचारदर्शन ग्रंथसंच जिल्हयातील व राज्यातील शैक्षणिक संस्था व ग्रंथालयांमध्ये उपलब्ध करुन देण्याबाबत**

सोबत श्री. सुधीरदादा उर्फ धनंजय सुशीला हरी गाडगीळ, मा. आमदार, सांगली विधानसभा मतदार संघ यांनी मा. मंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण) यांना लिहीलेले दिनांक ११/६/२०२६ चे पत्र व सहपत्र पाठविण्यात येत आहे.

२. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या दैदीप्यमान विचार, प्रखर राष्ट्रभक्ती आणि त्यांचा वैद्यानिक दृष्टीकोन आजच्या तरुण पिढीपर्यंत आणि विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी " हर घर सावरकर प्रतिष्ठान" पुणे व सकाळ प्रकाशन यांचे संयुक्त विद्यमाने "स्वातंत्र्यवीर सावरकर विचारदर्शन" ग्रंथसंचाचे प्रकाशन करण्यात आले आहे. सदरहू ग्रंथसंच सर्व शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याची विनंती सदरहू पत्रान्वये करण्यात आली आहे.

३. तरी, सदर निवेदनाच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

आपली,
सं.चं.जाधव
(संचिता जाधव)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत : वरीलप्रमाणे.

प्रत,

उपसचिव, ( मशि/विशि/ तांशि/ साशि), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

शिवि
8/7

सहसंचालक, तंत्र शिक्षण,
विभागीय कार्यालय, अमरावती
आवक क्र. 2703 दिनांक 09.07.26

महाराष्ट्र विधानसभा

सत्यमेव जयते

# सुधीरदादा उर्फ धनंजय सुशीला हरी गाडगीळ

**आमदार**

**सांगली विधानसभा मतदार संघ**

मा. मंत्री उच्च व तंत्र शिक्षण
संसदीय कार्य, महाराष्ट्र शासन
मंत्रालय मुंबई ४०० ०३२
ई-ऑफिस क्र. 1051116
दिनांक 30/6/2026

जा. क्र. 1432/2026 दिनांक 11/06/2026

प्रति,

**मा. ना. श्री. चंद्रकांत (दादा) पाटीलसो,**
**पालकमंत्री सांगली जिल्हा तथा,**
**उच्च व तंत्र शिक्षण मंत्री**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री कार्यालय
क्र. 10511116
दि. 02/07/26

**विषयः 'स्वातंत्र्यवीर सावरकर विचारदर्शन' ग्रंथसंच जिल्ह्यातील व राज्यातील शैक्षणिक संस्था व ग्रंथालयांमध्ये उपलब्ध करून देण्याबाबत ....**

**महोदय,**

उपरोक्त विषयान्वये, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे तेजोमय विचार, प्रखर राष्ट्रभक्ती आणि त्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन आजच्या तरुण पिढीपर्यंत आणि विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी 'हर घर सावरकर प्रतिष्ठान' (पुणे) प्रतिष्ठानने एक अत्यंत स्तुत्य वैचारिक उपक्रम हाती घेतला आहे. सकाळ प्रकाशन आणि हर घर सावरकर समिती यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्वातंत्र्यवीर सावरकर विचारदर्शन' या पाच महत्त्वाच्या ग्रंथांच्या संचाचे प्रकाशन करण्यात आले आहे. या संचामध्ये खालीलप्रमाणे स्वातंत्र्यवीरांच्या बहुआयामी पैलूंवर प्रकाश टाकणारे ग्रंथ समाविष्ट आहेतः १. हिंदुत्वनिष्ठ सावरकर २. साहित्यिक सावरकर ३. भाषाभिमानी सावरकर ४. विज्ञाननिष्ठ सावरकर ५. कादंबरीकार सावरकर हे ग्रंथ समाविष्ट आहेत.

हा ग्रंथसंच म्हणजे भावी पिढीमध्ये राष्ट्रभक्ती, सामाजिक बांधिलकी आणि इतिहासाबाद्दलचा अभिमान जागृत करणारा एक महत्त्वपूर्ण ऐवज आहे. प्रतिष्ठानची अशी विनंती आहे की, शासकीय पातळीवरून व शिक्षण विभागामार्फत राज्यातील सर्व प्राथमिक, उच्च माध्यमिक शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे तसेच सार्वजनिक ग्रंथालयांना हा ग्रंथसंच आपल्या ग्रंथालयासाठी उपलब्ध करून घेण्याबाबत आवाहन करण्यात यावे, तसेच यासाठी शिक्षण विभागाकडून सामूहिक मागणी (Bulk Order) नोंदवण्याबाबत सकारात्मक विचार व्हावा.

**स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे विचार आणि इतिहास प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे हे काळाची गरज आहे. तरी 'हर घर सावरकर प्रतिष्ठान' यांच्या या राष्ट्रनिष्ठ उपक्रमाची गांभीर्याने दखल घेऊन, सदर 'स्वातंत्र्यवीर सावरकर विचारदर्शन' ग्रंथसंच सर्व शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये पोहोचवण्याच्या दृष्टीने शासन पातळीवरून आवश्यक ते धोरणात्मक आदेश व सहकार्य मिळवून द्यावे,हि विनंती.**

आपला स्नेहांकित,

सुधीरदादा ऊर्फ धनंजय हरी गाडगीळ
**विधानसभा सदस्य**

कार्यालय : कमल हाईटस, तळमजला, सांगली-मिरज रोड, विश्रामबाग, सांगली ४१६४१५ ◆ दूरध्वनी : ०२३३-२३०४४४४, २३०४९४९

# हर घर सावरकर प्रतिष्ठान

CIN : U88900PN2026NPL255449

नोंदणीकृत कार्यालय : २९६ शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०

संपर्क : ९८९२७४८१८१ | ईमेल : hargharsavarkarpratishthan@gmail.com


दिनांक : १० जून २०२६

प्रती,
मा. आमदार श्री.सुधीरदादा गाडगीळ,
सांगली.

विषय : **'स्वातंत्र्यवीर सावरकर विचारदर्शन'** ग्रंथसंच महाराष्ट्र राज्यातील सर्व शैक्षणिक संस्था व ग्रंथालयांमध्ये उपलब्ध करून देण्याबाबत विनंती

महोदय,

आदरणीय सुधीरदादा,

महाराष्ट्र राज्या मधील आमदार म्हणून आपण राष्ट्रभक्ती, शिक्षण आणि समाजसेवेच्या कार्याला जी दिशा देत आहात, त्याबद्दल आम्ही आपले मनःपूर्वक आभारी आहोत. आपल्या व्यस्त दिनचर्येतून आम्हाला काही क्षण द्यावेत, ही नम्र विनंती.

आपणास ज्ञातच आहे की, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे तेजस्वी विचार देशाच्या घराघरांत पोहोचावेत, या उदात्त संकल्पनेतून सकाळ प्रकाशन आणि हर घर सावरकर समिती यांच्या संयुक्त विद्यमाने "स्वातंत्र्यवीर सावरकर विचारदर्शन" या पाच ग्रंथांच्या संचाचे प्रकाशन करण्यात आले आहे.

हा ग्रंथसंच म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या मूळ विचारांचे यथार्थ दर्शन घडवणारा एक महत्त्वपूर्ण वैचारिक दस्तऐवज आहे. या ग्रंथसंचातील पाच स्वतंत्र ग्रंथ पुढीलप्रमाणे आहेत :

१. हिंदुत्वनिष्ठ सावरकर
२. साहित्यिक सावरकर
३. भाषाभिमानी सावरकर
४. विज्ञाननिष्ठ सावरकर
५. कादंबरीकार सावरकर

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची, राष्ट्रनिष्ठ कार्याची आणि कालजयी विचारांची ओळख या ग्रंथसंचाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना, शिक्षकांना आणि सर्वसामान्य वाचकांना होईल, असा आमचा दृढ विश्वास आहे.

तरी आपणास विनंती आहे की, आपल्या विभागामार्फत महाराष्ट्र राज्यातील सर्व शाळा (प्राथमिक ते उच्च माध्यमिक), महाविद्यालये, विद्यापीठे तसेच सार्वजनिक ग्रंथालयांना हा 'स्वातंत्र्यवीर सावरकर विचारदर्शन' ग्रंथसंच त्यांच्या ग्रंथालयांसाठी उपलब्ध करून घेण्याबाबत आवाहन करण्यात यावे.

# हर घर सावरकर प्रतिष्ठान

CIN : U88900PN2026NPL255449

नोंदणीकृत कार्यालय : २९६ शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०

संपर्क : ९८९२७४८१८१ | ईमेल : hargharsavarkarpratishthan@gmail.com

हर घर सावरकर प्रतिष्ठान

तसेच, शिक्षण विभागामार्फत या ग्रंथसंचांची सामूहिक मागणी (Bulk Order) नोंदविण्याचा विचार करण्यात यावा, जेणेकरून राज्यभरातील विद्यार्थ्यांना आणि अभ्यासकांना स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या विचारांचा अभ्यास करण्याची संधी उपलब्ध होईल.

हा उपक्रम केवळ ग्रंथवितरणापुरता मर्यादित नसून भावी पिढ्यांमध्ये राष्ट्रभक्ती, वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक बांधिलकी आणि इतिहासाबद्दल अभिमान जागृत करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करेल, असा आम्हाला विश्वास आहे.

आपण स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विचारांना राज्यातील प्रत्येक शैक्षणिक संस्थेपर्यंत पोहोचविण्यासाठी सकारात्मक प्रतिसाद द्याल, अशी आम्हाला खात्री आहे.

आपल्या सकारात्मक सहकार्याच्या अपेक्षेसह.

धन्यवाद.

आपला विश्वासू,

**हर घर सावरकर प्रतिष्ठान**

**संचालक**
**यशवंत अकोलकर**
**(संपर्क ९४२२० ०४६५३)**